महाराष्ट्र शासन
**शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय**
१७ डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड, लालदेऊळाजवळ, पुणे-१
दूरध्वनी क्रमांक०२०-२६१२५६६६ — फॅक्स नं.- ०२०-२६१२२२१७
ई-मेल आय डी. क्र dydpune@gmail.com — वेब साईट आय.डी.क्र. www.dydepune.com

---

जा.क्र.शिउसं/वि.अता.प्रश्न /पुवि/२०१६-१७/ 3360 दि.- / /२०१७

23 MAY 2017

कृपया तात्काळ :-

प्रति,
**शिक्षणाधिकारी, (प्राथमिक / माध्यमिक),**
**जिल्हा परिषद, अहमदनगर, पुणे, सोलापूर.**

विषय - विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. ७९८३३.
राज्यामध्ये मोठया प्रमाणात शासकीय शाळातील शिक्षक अवैध खाजगी शिकवण्या घेत असलेबाबत.
मा.श्री.धनंजय (सुधीर) गाडगीळ (सांगली).

संदर्भ :-१.मा.अवर सचिव, शा.शि.व क्री. विभाग, यांचे पत्र क्रमांक विप्रप-१११७ / (प्र.क्र.९७)/ एसएम ३/ दि.०८.०५.२०१७.

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.७९८३३ ची प्रत आपल्या अवलोकनार्थ पाठवित आहोत, सदरच्या प्रश्नामध्ये विधानसभा सदस्य मा.श्री.धनंजय (सुधीर) गाडगीळ (सांगली) **यांनी राज्यामध्ये मोठया प्रमाणात शासकीय शाळातील शिक्षक अवैध खाजगी शिकवण्या घेत असले बाबतची माहिती मागविलेली आहे.** त्या अनुषंगाने आपल्या कार्यक्षेत्राशी निगडीत असलेली प्रश्ननिहाय माहिती, पुरवणी व टिपणीसह आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास , मा. आयुक्त व प्रस्तुत कार्यालयास तात्काळ सादर करावी, सदर बाबतीत कोणत्याही प्रकारची दिरंगाई होणार नाही , याची आपण दक्षता घ्यावी. तसेच दिरंगाई झाल्यास आपण स्वतः वैयक्तिक रित्या दिरंगाईस जबाबदार राहाल याची कृपया आपण नोंद घ्यावी.

(B. M. Boonam)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१
for

सोबत :- शासनाचे प्रश्नाबाबतचे पत्राची प्रत.

17 MAY 2017
आवक नोंदवही क्रमांक

महाराष्ट्र शासन

क्रमांक: विपप्र-१११७ /( प्र.क्र.९७ ) / एसएम-३
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मंत्रालय, मुंबई
दिनांक : ८.५.२०१७

प्रति,
आयुक्त शिक्षण,
मध्यवर्ती इमारत डॉ.ॲनी बेझंट रोड,
पुणे.

विषय- विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक -७९८३३
- राज्यामध्ये मोठया प्रमाणात शासकीय शाळातील शिक्षक अवैध खाजगी शिकवण्या घेत असलयाबाबत.
श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली)

संदर्भ:- महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे पत्र क्रमांक निरंक दिनांक-निरंक चे पत्र.

उपरोक्त संदर्भाधिन विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक ७९८३३ची प्रत सोबत जोडली आहे.

२. त्याअनुषंगाने सदर प्रश्नाची प्रश्ननिहाय माहिती, पुरवणी व टिपण्णीसह आपल्या स्वयंस्पस्ट अभिप्रायासह शासनास तात्काळ सादर करण्यात यावी. सदर माहिती सादर करण्यास विलंब झाल्यास याबाबतची ~~सर्वस्वी~~ जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील यांची कृपया नोंद घ्यावी.

( दिलीप देशपांडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- माहितीस्तव व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित
1. १) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
2. २) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे.

Hsec 402
Sec - 301 / 302 / 303
17/05

क्रमांक - ______ / ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
दिनांक -

प्रति,
सचिव
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (शालेय शिक्षण)**
महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

महोदय,

खालील उद्‌धृत केलेला विधानसभा अतारांकित प्रश्न माननीय अध्यक्षांनी स्वीकृत केला आहे. सदरहू प्रश्नाचे उत्तर महाराष्ट्र विधानसभा नियम ७२ (२) अन्वये तीस दिवसांच्या आत म्हणजे **दिनांक २० मे, २०१७ पावेतो** या सचिवालयास पाठविण्यात यावे -

**प्रत माहितीसाठी सादर अग्रेषित --**
(१) माननीय मुख्यमंत्री
(२) माननीय **शालेय शिक्षण मंत्री**
(३) सर्व संबंधित सदस्यांना

आपला

प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा

---

**राज्यामध्ये मोठया प्रमाणात शासकीय शाळातील शिक्षक अवैध खासगी शिकवण्या घेत असल्याबाबत**

**अतारांकित प्रश्न क्रमांक ७९८३३ श्री. धनंजय (सुधीर) गाडगीळ (सांगली)**

**सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-**

(१) राज्यामध्ये मोठया प्रमाणात शासकीय शाळातील शिक्षक अवैध खासगी शिकवण्या घेऊन शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेमध्ये दिल्या जाणाऱ्या २0% प्रॅक्टीकलचे अमिष दाखवून आपल्याच शिकवण्यामध्ये प्रवेश घेण्यासाठी जबरदस्ती करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरेआहे काय,
(२) असल्यास, या विरोधात प्रोफेशन टीचर्स असोशिएशन यांनी एकत्र येऊन आदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यामध्ये अश्या एकूण किती अधिकृत शिकवण्या आहेत,
(४ )असल्यास, शासनाने सदरील प्रकरणाची चौकशी करुन संबंधीत दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे तसेच याबाबतची नेमकी सद्‌यस्थिती काय आहे?

sm-3